राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र.CIC/अ.क्र.६५९५/२०२६

श्री. हितेश हरिचंद्र कोळी
मु. गव्हाण, पो. व ता. पनवेल,
जि. रायगड पिन ४१० २०६.

विरुद्ध

जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण बांद्रा पूर्व, मुंबई 400 051.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण बांद्रा पूर्व, मुंबई 400 051.

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०५.०८.२०२६

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

मूळ अर्जाचा दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक	प्रथम अपीलाचा दिनांक	प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक
१४.०२.२०२२	११.०३.२०२२	१७.०३.२०२२	०६.०५.२०२२

अपिलार्थीनी पारबंदर (एमटीएचएल) प्रकल्पामध्ये मासेमारी धंद्याची हानीची रक्कम वाटप करताना तक्रार निवारण समिती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी इलेक्ट्रॉनिक डाटाबेस मच्छीमार (TF) ओळखपत्र पुरावा असून दिनांक ०५/०१/२०२२ रोजीच्या इतिवृत्तात तहसीलदार यांचे प्रमाणपत्र ज्या अधिनियमान्वये घेण्यास सांगितले आहे त्या अधिनियमांच्या प्रती अशी माहिती मागितली असून त्यावर दिनांक ११/०३/२०२२ रोजी **प्राधिकरणातील तत्कालीन जन माहिती अधिकारी व कार्यकारी अभियंता यांनी खालील प्रमाणे उत्तर दिलेले आहे :-**

याविरुद्ध अपिलार्थीनी **कलम १८ (ड)** नुसार दिशाभूल करणारी माहिती दिली आहे व **कलम ७ (१)** चे उल्लंघन केले असून मागितलेला दस्तऐवज दिला नसल्याचा आक्षेप नोंदविलेला आहे. यावर तत्कालीन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता श्री.निमजे यांनी दिनांक २०/०४/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीत श्री.कोळी यांचा विषय तक्रार निवारण समितीच्या दिनांक २७/०४/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये चर्चेकरिता मांडण्यात येईल व योग्य तो निर्णय घेण्यात येईल असे नमूद करीत अपील अर्ज निकाली काढला आहे. त्या विरुद्ध

दिनांक १२/०५/२०२२ रोजी प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल करण्यात आला असून अपिलार्थीनी घेतलेल्या निर्णयामागे कारणमीमांसा अथवा प्रत्यक्ष दस्तऐवज उपलब्ध असल्यास तो प्रदान करावा अशी आग्रही विनंती केलेली असून जन माहिती अधिकाऱ्यांनी **कलम २ (च)** नुसार या संदर्भात घेतलेल्या निर्णया बाबत स्पष्टीकरण दिले असले तरी प्रत्यक्षात त्यांच्याकडून माहिती आहे त्या स्वरूपात देणे अपेक्षित असून माहिती तयार करून देणे, एखाद्या कार्यवाही मागची कारणमीमांसा करणे, अभिप्राय देणे अथवा आदेशाचा अन्वयार्थ लावणे या बाबी अपेक्षित नाहीत. तथापि, प्रस्तुत प्रकरणी घेतलेल्या प्रशासकीय निर्णयाबाबत कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली संपूर्ण नस्ती तसेच तत्कालीन अपिलीय अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीनी मांडलेला विषय व केलेली तक्रार ही तक्रार निवारण समिती समोर दिनांक २७/०४/२०२२ रोजी ठेवणार येणार असल्याबाबत केलेले विधान इत्यादी बाबी लक्षात घेता अपिलार्थीनी दिनांक ०५/०१/२०२२ रोजीच्या इतिवृत्तात घेतलेला निर्णय याबाबतची नस्ती तसेच अपिलीय अधिकाऱ्यांनी दिनांक २७/०४/२०२२ रोजीच्या ज्या बैठकीचा उल्लेख अपिलीय आदेशात केलेला आहे त्या बैठकीचे इतिवृत्त व अपिलार्थीनी केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयीन अभिलेखात **कलम २ (च)** प्रमाणे उपलब्ध असलेली माहिती ही अपिलार्थीना विनामूल्य देण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

आदेश

१. **वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
२. **अपिल क्र.६५१५/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.**

स्वाक्षरीत/-

मुंबई **(राहुल भा.पांडे)**

दिनांक : ०५.०८.२०२६ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**